PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Bagh haat dakhvun
Year: 2006

Song: Raat kirkiri daat
Lyricist: Kiran Yadnyopavit

हां...
रात किरकिरी दाटं
चकव्याचं रान
रात किरकिरी दाटं
चकव्याचं रान
आतुरलं डोळं कान
थरकलं पान
आतुरलं डोळं कान
थरकलं पान
पाणी पाणी काळजाचं झालं गं
पाणी पाणी काळजाचं झालं गं
बघ पाण्यावरी सावध आलं गं
बघ पाण्यावरी सावध आलं गं

भडकली ज्वानी उभ्या नागिणीचा डौल
हो भडकली ज्वानी उभ्या नागिणीचा डौल
दिलेर तहान घेई शिकाऱ्याचा कौल
दिलेर तहान घेई शिकाऱ्याचा कौल
उरी उधाण उठणे जीवी उमळली माया
जहरील्या तीरापायी आसुसली काया
मदहोशी चांदण्यात न्हालं गं
मदहोशी चांदण्यात न्हालं गं
बघ पाण्यावरी सावध आलं गं
बघ पाण्यावरी सावध आलं गं

अलवार फासं हो अलवार फासं
राया
आ...
अलवार फासं हो अलवार फासं
तुम्ही पाखरांचं छंदी
अलवार फासं
राया तुम्ही पाखरांचं छंदी
सापळ्यात दानं ओठी जल्माचा बंदी
सापळ्यात दानं ओठी जल्माचा बंदी
उतरंना भूल देह मायेचं सोहळं
अखेरच्या चाहूलीनं मिटलं गं डोळं
उतरंना सुख दुवा ल्यालं गं
उतरंना सुख दुवा ल्यालं गं
बघ पाण्यावरी सावध आलं गं
बघ पाण्यावरी सावध आलं गं
बघ पाण्यावरी सावध आलं गं
बघ पाण्यावरी सावध आलं गं

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*